# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


जाक्र.मजीप्रा/सस/गुप व दप/ ९३/2015 दिनांक :- २६ ऑक्टोबर २०१५

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
गुणवत्ता परिक्षण पथक
मुंबई.

| | |
|---|---|
| अ. अ. | |
| मुख्य. अभि. | |
| शाखा | |
| आवक क्रं. | |
| दिनांक | |

परिपत्रक क्रमांक — ९६१

**विषय :- म.जी.प्रा.च्या नविन संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी www.mjp.gov.in या संकेतस्थळाचा वापर करणेत येत होता. सदर संकेतस्थळाचा पुनर्विकास करुन दि. 21 ऑक्टोबर 2015 पासून म.जी.प्रा. साठी https:\\ mjp.maharashtra.gov.in हे नविन संकेतस्थळ सुरु करण्यात आलेले आहे.

सदर संकेतस्थळावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आतापर्यंत राबविलेले विशेष प्रकल्प, चालू असलेले प्रकल्प, पाण्याचे सद्यस्थितीत लागू असलेले दर, निविदाबाबतची माहिती, दरसूची, परिपत्रके, कर्मचारी सेवाज्येष्ठता सुची, इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध होणार आहे. सदर संकेतस्थळावर नागरीकांसाठी नागरिकांची सनद, माहिती अधिकार अधिनियम - 2005, नळ जोडणी / खंडीत करणे इ. अर्ज, ग्राहक तक्रार निवारणांबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याशिवाय या संकेतस्थळावर मान्यताप्राप्त कंत्राटदारांची व विक्रेते यांची यादी तसेच कंत्राटदार व विक्रेते यांचेसाठी अर्ज डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवणेच्या दृष्टीने क्षेत्रिय कार्यालयांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. सदर संकेतस्थळावर माहिती भरणेसाठी पहिल्या टप्प्यात सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, मुख्यालय, वित्त शाखा, आस्थापना शाखा, यांचे login ids बनविण्यात आलेले आहेत. सदर संकेतस्थळाबाबत प्रशिक्षण आयोजित केल्यानंतर वरील सर्व जबाबदार अधिका-यांनी त्यांचेकडील माहिती एक महिन्याच्या आत संकेतस्थळावर अद्ययावत करावयाची आहे.

( संतोष कुमार )
सदस्य सचिव

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**

**प्रत** :- संचालक (तांत्रिक), म.जी.प्रा. मुंबई.
**प्रत** :- संचालक ( वित्त ), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
**प्रत** :- मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
**प्रत** :- मुख्य अभियंता ( सर्व ) म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग,

..२..

**प्रत :-** अधीक्षक अभियंता ( मुख्यालय ), म.जी.प्रा. मुंबई.
**प्रत :-** अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, ठाणे.
**प्रत :-** अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मनिसंस कक्ष, ठाणे.
**प्रत :-** अधीक्षक अभियंता ( सर्व ) म.जी.प्रा. मंडळ,
**प्रत :-** कार्यकारी अभियंता ( सर्व ) म.जी.प्रा.

168